Environmental Conservation & Disaster Management

Editor

Dr. Baliram Pawar

Sanjay Jagtap

Balaji Acharya

Environmental Conservation & Diaster Management

Late Ramesh Warpudkar College
Sopneth
Dist.Parbhani
(M.S.)

: Editors :

Dr. Baliram Pawar
Head, Department of Sociology
Mahatma Fule Mahavidyalaya Kingaon,
Tq. Ahmedpur Dist Latur, Maharashtra

Sanjay Jagtap
Head, Department Public Adm.
Mahatma Fule Mahavidyalaya Kingaon,
Tq. Ahmedpur Dist Latur, Maharashtra

Balaji Acharya
Head, Department of Economics
Mahatma Fule Mahavidyalaya Kingaon,
Tq. Ahmedpur Dist Latur, Maharashtra

Sanskruti Publication, Latur

Sanskruti Publication

ISBN : 978-81-971567-6-2

Environmental Conservation & Diaster Management

Editors : Dr. Baliram Pawar
Sanjay Jagtap
Balaji Acharya

Copyright © Authors 2024

Late. Ramesh Warpudkar College
Sonpeth
Dist.Parbhani
(M.S.)

Sanskruti Publication
Gaikwad Building, Ganesh Nagar,
Old Ausa Road, Latur
Mob. 9403163700

First Editon : 31 March 2024

Offset : Indo Vision, Latur

Front Page Design : Vikas Dhamale

Note : All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed or transmitted in any form or by any means, including photocopying, recording, or electronic or mechanical methods, without the written permission of the publishe the Author.

Sr. No	Paper	Page No
15	Environmental Administration & Sustainable Development **Dr. Arti Bhatnagar**	71
16	Shakespeare's Hamlet : An Anti-hero of Genius **Dr. Dattatraya Mukundrao More**	75
17	Women's Participation in Swachh Bharat Abhiyan : A Catalyst for Societal Transformation **Renuka Madhavrao Kulkarni**	78
18	Environment and Human Health **Anil Natthu Patil**	81
19	स्वच्छ भारत अभियान में कामकाजी महिलाओं की भूमिका एवं सशक्तिकरण का अध्ययन **मात्रे प्रतिभा, वर्मा कौशलेन्द्र**	84
20	स्वच्छ भारत अभियान में जनजाति महिलाओं का योगदान : एक अध्ययन (मध्यप्रदेश के झाबुआ जिले के विशेष सन्दर्भ में) **डॉ. सपना मोरे**	89
21	स्वच्छ भारत मिशन में महिलाओं का योगदान **अरती गुप्ता, डॉ. संजय पाल**	94
22	स्वच्छ भारत मिशनमध्ये महिलांचे योगदान (विशेष संदर्भ : जळगाव जिल्हा (चिखली बु.) **डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे, उज्वला रामचंद्र महाजन**	98
23	शाश्वत विकासात मानव आणि समाजाची भूमिका **डॉ सुनिता आत्माराम टेंगसे**	102
24	पर्यावरण संवर्धन काळाची गरज **डॉ. सुभाष रा. यादव**	107
25	लोकसंख्येचा विस्फोट आणि पर्यावरण **डॉ. आर. के. खोकले**	112

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

1

Human greed and degradation of environment

Dr. Tukaram Balasaheb Bobade
Head Dept. of English,
P. A. H. College,
Ranisawargaon, Tq. Gangakhed Dist. Parbhani

Introduction:

The basis for the origin of life on earth was the suitable environment here. Thousands of years have been passed since the origin of human race on this earth.The environment was favorable for the origin and development of mankind.The human race was also living a life that would be compatible with the environment.The relationship between humaans and the environment was mutually beneficial. Many elements of the environment were worshiped as gods on various occasions. Since ancient period, human beings have lived their lives with the view of protection and welfare of the environment. There have been many changes in the history of human culture. With the help of science and technology, humans have brought about a great revolution in the material world. Gradually the definition of human life changed. Man used to live for spiritual satisfaction, now he started living for material happiness. The need for physical tools has changed and transformed into the greed to store them. This tendency put man in the role of exploiting the environment. "The major factor of environmental degradation is human (modern urbanization, industrialization, overpopulation growth, deforestation, etc.) and natural (flood, typhoons, droughts, rising temperatures, fires, etc.) cause." (https://www.aesacademy.org/books/edcrs-vol-1/01.pdf) The man who protected the environment became its devourer. This research article discusses the adverse effects of this human tendency on the environment.

Objectives :-

The objectives of the present research paper are as follows:

1. To emphasize the importance of environment in human life.
2. Explain the changing role of humans in the environment.
3. To describe the impact of human greed on the environment.

Hypotheses:-

The hypotheses of the present research paper are as follows:

1. The relationship between man and nature is disturbed.
2. Due to human's desire for material pleasure, the environment is badly affected

Late Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

23.

शाश्वत विकासात मानव आणि समाजाची भूमिका

डॉ सुनिता आत्माराम टेंगसे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कै रमेश वरपुकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी

प्रस्तावना :

पृथ्वीच्या पृष्ठभागावर वातावरणात आणि पृथ्वीच्या अंतरंगात जे सामावलेले आहे त्या सगळ्यांचा समावेश पर्यावरणात केला जातो, यात जमीन, हवा, पाणी, निरनिराळे वायू, सर्व वनस्पती, सर्व सजीव, खनिजे, नैसर्गिक वायू, खनिज तेल या सर्वांनी मिळून जी परिस्थिती तयार होते त्यालाच आपण पर्यावरण असे म्हणतो. पर्यावरणाच्या केंद्रस्थानी स्वतःची स्थिती कायम ठेवून मानवाने नैसर्गिक संतुलन बिघडविण्यास सुरुवात केलेली आहे. निसर्गामध्ये मानवाचा हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे नैसर्गिक प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊन पर्यावरणाचे असंतुलन होत आहे. पर्यावरणाचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत असून, पर्यावरणाच्या संतुलनावरच संपूर्ण सजीव सृष्टी ही अवलंबून आहे.मानवाला जर दीर्घकाळ जगायचे असेल तर त्याने निसर्गात हस्तक्षेप न करता, निसर्गाला मदत करणे आवश्यक आहे. पृथ्वी हा एक उत्तम ग्रह असून त्यावर सजीव सृष्टी साठी आवश्यक असे पोषक वातावरण आहे. पृथ्वीला प्राप्त झालेले वातावरण तिच्या संरक्षक कवच आहे. या वातावरणात पुरेसा प्राणवायू असून तो सजीवांसाठी जीवन संजीवनीच आहे. मनुष्य अन्न पाण्याशिवाय काही वेळ जगू शकेल पण हवा ,प्राणवायु मानवाला जगण्यासाठी आवशक्य आहे.

शाश्वतता ही संकल्पना चार बाबींशी निगडित आहे .पर्यावरणीय, आर्थिक ,सामाजिक आणि संस्थात्मक शाश्वतता या चार बाबींपैकी एक किंवा जास्त बाबी दुर्लक्षित झाल्या की समाजाची प्रगती खुंटते किंवा समाजाच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होते. शाश्वतता म्हणजे एखादी अवस्था जी थोड्या किंवा अनंता काळापर्यंत टिकून राहते. पर्यावरणीय शाश्वतता म्हणजे मानव व इतर सजीवांना जीवन आवश्यक वस्तू व सेवा पूर्ववत राहण्याची परिसंस्थेची क्षमता होय. पृथ्वीवरील नैसर्गिक स्त्रोतांचे पर्यावरणीय ऱ्हासापासून संरक्षण व संवर्धन करणे यालाच शाश्वतता असे म्हणतात.

शोधनिबंधाचा उद्देश :

१) शाश्वत विकास म्हणजे काय हे स्पष्ट करणे.
२) शाश्वत विकासासाठी मानवाचे आणि समाजाची भूमिका जाणून घेणे
३) शास्वत विकासात व्यक्ति व समाजाच्या सहभागाचे आवश्यकता प्रतिपादित करणे
४) शाश्वत विकासा पुढील आव्हाने स्पष्ट करणे.

तथ्यसंकलन पद्धती शोधनिबंध लेखनासाठी पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके,साप्ताहिके, इंटरनेटवरील माहिती या दुय्यम तथ्य संकलन सामग्रीचा वापर केला आहे.

गृहितकृत्य:

मानव स्वतः हाच्या स्वार्थापोटी नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास करून शाश्वत विकासात

अडथळा आणत आहे. पर्यावरणाला हानी न पोहोचवता साधन संपत्तीचा वापर योग्य पद्धतीने करणे म्हणजे साधन संपत्तीचा चिरंतन शाश्वत वापर करणे होय. चिरंतन विकास प्रक्रियेनुसार विकारा हा पुढील पिढीसाठी समृद्ध व परिपूर्ण राहील अशा दृष्टिकोनातून केला जाणे आवश्यक आहे. मानवाची प्रत्येक वेळी ही संसाधनांचा विकास व ऱ्हास करत असतो, परंतु संसाधनांच्या ऱ्हासाचा व वापराचा वेग संसाधनांच्या विकासाच्या कितीतरी अधिक प्रमाणात आहे.

आजच्या पिढीने अचक्रीत संसाधनांचा वापर मर्यादित केला पाहिजे आणि पुनर्वापर होणाऱ्या संसाधनांचा वापर वाढवला पाहिजे. वारा सौर ऊर्जा यासारख्या आपोआप पुर्ननिर्माण होणाऱ्या साधनसंपत्तीचा वापर वाढवला पाहिजे, व कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू यासारख्या नष्ट होणाऱ्या साधन संपत्तीचा वापर कमी केला पाहिजे. तसेच पर्यावरणाला अपायकारक न होणाऱ्या साधन संपत्तीचा वापर मानवाने केला पाहिजे. साधन संपत्तीच्या मर्यादित वापर पुनर्वापर व पुनर्चक्रीकरण याचा अवलंब करून साधन संपत्तीचा वापर करताना भविष्यकाळाचा विचार मनात ठेवणे आवश्यक आहे. कारण की पर्यावरणावर आजची पिढी आणि भावी पिढी यांचा सारखाच हक्क आहे. आपण पर्यावरणाचा ऱ्हास करून भावी पिढीचा हा वाटा हिसकावून घेऊ शकत नाहीत. या समान हक्काला जनरेशन इक्विटी असे म्हणतात. म्हणून चालू पिढीचे पर्यावरण संवर्धन करणे हे कर्तव्य आहे व चालू पिठीने ते करणे हा भावी पिढीचा अधिकार आहे. याच प्रमाणे चालू पिढीतही विविध देशातील लोकांचा पर्यावरणावर सारखाच हक्क आहे. या समान हक्काला इंट्राजनरेशन इक्विटी असे म्हणतात. विकसित देश प्रचंड गतीने पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे. म्हणजे भारतासारख्या व विकसनशील देशातील लोकांचा पर्यावरणातील वाटा ते हिसकावून घेत आहेत, म्हणून विकसित देशांचे पर्यावरण संवर्धन करणे हे कर्तव्य आहे. व विकसित देशांनी ते करणे हा विकासाची देशाचा अधिकार आहे. मग एक प्रश्न पडतो तो म्हणजे विकसित देश पर्यावरण संवर्धन कसे करतात याचे उत्तर हे अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसित देशाने फक्त आर्थिक वाढीवर लक्ष केंद्रित न करता स्त्रोताचा योग्य वापर करणे, हरितगृह वायूंचे उत्सर्जित कमी करणे, ऊर्जा, कार्यक्षमता वापरणे म्हणजेच इत्यादी मार्ग अवलंबिले पाहिजेत. परंतु त्यासोबतच विकसनशील देशांना पर्यावरण बदलावर प्रभावी उपायांसाठी आर्थिक व तांत्रिक मदत केली पाहिजे.

निसर्गाचे कायमस्वरूपी नुकसान करून मानव जातीला शाश्वत विकासात अडथळा होणार नाही यासाठी प्रत्येकाने आपली जीवनशैली पर्यावरण पूरक ठेवण्याच्या दृष्टीने संकल्प करणे गरजेचे आहे. पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी मानवी व नैसर्गिक साधन संपत्ती निश्चित विकसित प्रतिमान याच धोरणाचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नाही. पृथ्वी जपने ,तीला सुजलाम सुफलाम करणे ही जबाबदारी प्रत्येकाची आहे आणि यातच मानवी समुदायाची सौख्य सामावलेले आहे.औद्योगिक क्रांतीनंतर पर्यावरणात हरितगृह वायूचे प्रचंड प्रमाणात उत्सर्जन झाल्यामुळे, पर्यावरणात गंभीर व कायमचे बदल होऊन जागतिक तापमान वाढ अर्थात ग्लोबल वॉर्मिंग होत आहे. या पर्यावरणीय बदल चालू पिढीला व त्याबरोबरच भावी पिढीला घातक ठरणार आहे, तसे होऊ नये यासाठी आपल्याला शाश्वत विकास साधने आवश्यक आहे. तसू शाश्वत विकासासाठी सामूहिक प्रयत्नांचीही आवश्यकता आहे.

शाश्वत विकासात सामाजिक राजकीय आर्थिक विचारांची आव्हान :

मानवाच्या सर्वांगीण शाश्वत विकासात सामाजिक, राजकीय, आर्थिक घटकांचे महत्त्वाचे स्थान आहे. या तिन्ही घटनांशिवाय शाश्वत विकास अशक्य आहे. सामाजिक विचार शाश्वत विकासात समाजाचा खूप मोठा वाटा आहे. समाजाला जेव्हा आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागते तेव्हा चिपको

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

सारख्या चळवळीचा जन्म होतो. राजस्थान १७३१ मध्ये चिपको चळवळ सुरू झाली? अमृता देवी त्यांचे पती व तीन मुले असे एकूण ३६० बिशनोई समाजाच्या व्यक्तीने खेजरी वृक्षांना वाचविण्यासाठी आपले बलिदान केले. शिक्षणाचा प्रसार व सामाजिक मूल्यांची जाणीव यात फार फरक आहे विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत शिक्षणाचा प्रसार अल्पसा होता, परंतु त्या काळच्या अशिक्षित जनतेने पर्यावरणाचे संतुलन राखलेले होते परंतु आज शिक्षणाचा विकास झालेला असला तरी किती टक्के जनतेला पर्यावरण संवर्धनाचे जाणीव आहे. दिवसाढवळ्या जंगलाची कत्तल होते.तेथील जनता व अधिकारी व कर्मचारी काय करतात हा एक संशोधनाचा विषयच आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेला समाज अधिकारी किंवा मंत्री याला जबाबदार नाहीत का? सरकारच्या परवानगीशिवाय लाकूड कापण्याच्या गिरन्या जंगलातल्या खुलेआम सुरू असतात. या प्रकाराला आळा घातला पाहिजे कारण जनता काहीही समाज हितासाठी करू शकते ही भावना रुजवण्याची आवश्यकता आहे आणि अशा सामाजिक भावना रुजवण्यासाठी नैतिक मूल्यांचे शिक्षण संस्कार व शिस्तीचे शिक्षण गरजेचे आहे व्यवहारात उपयोगी असणारे शिक्षण हवे आहेत यावर पुस्तके ज्ञान देऊन समाजात बदल होणार नाही तर व्यवहार उपयोग विज्ञान आजच्या पिढीला देण्याची नितांत आवश्यकता आहे.

राजकीय विचार प्रत्येक देशात विविध राजकीय प्रणाली कार्य करत आहेत प्रत्येक राजकीय प्रणालीची तत्वे समाज विकास व निसर्ग कल्याणनाशी निगडित आहेत, पण प्रत्यक्षात हे विचार किती जोपासले जातात. एक राजकीय पक्ष जनकल्याणकरिता धरणे बांधतो तर दुसरा पक्ष सत्तेत आल्याने त्या धारणांचा निधी थांबवून ठेवतो. पन्नास ते साठ वर्षापर्यंत अशा धरणांचे बांधकाम पूर्ण झालेल्या आपल्याला दिसते .नैसर्गिक आपत्तीमुळे त्या जनतेला सरकारी मदत पूर्णपणे दिली जाते का तर यांचे उत्तर नाही असे आहे .वृक्ष लागवडीचे नाटक अनेक वेळा आपणास समाजात दिसते, त्या लावलेल्या वृक्षाचे संवर्धन होते का याचा विचार राजकीय प्रणालींनी करायला हवा. राजकीय पक्ष आपली आदर्श तत्वे बाजूला सारून स्वार्थापोटी किंवा गटबाजी मुळे राजकीय व्यवस्था कमजोर करून जनतेचे म्हणजेच पर्यावरणाचे नुकसान करतात. प्रत्येक राजकीय पक्षाचा कार्यकर्ता सुसंस्कारमुळे मानवतावादी निस्वार्थी पर्यावरण प्रेमी असावा. यापुढे जनता काम न करणा?या, फक्त थापा मारणा?या नेत्यांना थारा देणार नाही. सामान्य जनतेला याची जाणीव होऊ लागली आहे. म्हणून प्रत्येक राजकीय पक्षांनी आपल्या अस्तित्वाकरिता सर्व जनतेचा शाश्वत विकास करून देशाला प्रगतीपथावर नेण्याची आज गरज आहे.

आर्थिक विचार :

शाश्वत विकास आर्थिक विकासावर आधारित आहे. नैसर्गिक समृद्धी त्यासाठी गरजेचे असते. आर्थिक विकास साधताना नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होता कामा नये. मानवाच्या आर्थिक उन्नतीसाठी भारतासारख्या कृषी प्रधान देशात, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून रासायनिक खते व औषधांचा अति उपयोग करून, कृषी योग्य जमिनी प्रत प्रतिवर्षी कमी होत आहे. पाण्याचा अतिवापर करून जमिनी खारपट होत आहेत. मोठ्या शहरातील कृषी मध्ये जमिनीचे उपयोग सिमेंटच्या जंगलातरीता होत आहे. भारतीय आर्थिक विकासात शेती महत्त्वाचा घटक आहे परंतु काही भागात पाण्याचा अतिवापर रासायनिक खते व कीटकनाशकांच्या योग्य वापरामुळे जमिनीचे प्रदूषण वाढत आहे. म्हणून आर्थिक विकास व पर्यावरण यांचा समन्वय साधून शाश्वत विकास करणे गरजेचे आहे. कृषी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, पण सरकारचे लक्ष कृषी कडे फारसे नाही. शेतकऱ्याच्या आत्महत्या ही जनतेचे बाब आहे. सर्वसमावेशक सर्वसमावेशक विकास हवा असेल तर शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्व प्रयत्न करावे

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

लागतील. शेती आर्थिक दृष्ट्या परवडणारी झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर आधारित
शेतमालाची किंमत मिळणे आज गरजेचे आहे. कारखान्यातील उत्पादन केलेल्या वस्तूची किंमत
उत्पादक ठरतो, पण शेतीत उत्पादित मालाची किंमत व्यापारी किंवा दलाल ठरवतो. हे चित्र जोपर्यंत
बदलत नाही तोपर्यंत भारतातील शेतकऱ्याचा आर्थिक विकास होणे शक्य नाही.

शाश्वत विकासात व्यक्ती व समाजाचा सहभाग :

समविचाराच्या अनेक व्यक्ती एकत्र आल्या म्हणजे समाज निर्मिती होते, प्रत्येक व्यक्ती आपला
विकास करताना पर्यायाने समाजाचा विकास करतो. अनेक समाज एकत्र येतात व प्रदेशाची निर्मिती
होते. लोकसंख्या वाढत जाते, प्रत्येकाच्या मूलभूत गरजा वाढतात. त्याचप्रमाणे नैसर्गिक साधन संपत्तीचा
वापर वाढत जातो, काही व्यक्तीच्या विचाराने नैसर्गिक साधनांचा रास होताना जमिनीचा दर्जा, प्रदूषित
पाणी, अन्न आणि हवा याची जाणीव होऊ लागते. हा बदल अचानक न होता हळूहळू होत असतो त्याची
जाणीव मानवाला फार उशिरा होते. राजस्थनातील वाळवंट एका वर्षात निर्माण झालेले नाही, पूर्वी
त्याला दुधा मधाचा प्रदेश म्हटले जात असे. निसर्गाच्या ऱ्हासाला त्या त्या प्रदेशातील मानव हाच
जबाबदार आहे. पृथ्वीची उत्पत्ती झाली तेव्हापासून पर्यावरणात बदल होण्याची प्रक्रिया सातत्याने चालू
आहे कालंकाराने मानवाच्या उत्पत्ती नंतर त्याचाही सहभाग या प्रक्रियेत व्हायला लागला. मानवाने
निसर्गाशी मिळते जुळते घेतले, तर प्रसंगी त्याच्यावर मात केली. विसाव्या शतकात मानवाने सर्वांना
केली आहे परंतु एकविसाव्या शतकात पूर्ण वर्चस्व करण्याचे स्वप्न मानव पाहत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा
समतोल ढासळत आहे आज मानवाला शाश्वत विकासाची गरज भासू लागली आहे, प्रत्येक जागृत
व्यक्ती व समाज पर्यावरणाचे संवर्धन करू शकतो. पर्यावरणीय गुन्हे व कायदाभंग तो संबंधित
अधिकाऱ्याला सांगू शकतो. सामान्य व्यक्ती देखील न्यायालयात जनहित याचिका दाखल करून
शाश्वत विकासाला मदत करू शकतो.विचार व विचारबद्ध नागरिकांचा छोटासा गट जग बदलू शकतो
याविषयी शंका घेऊ नका आजवर गोष्टी घडत आले आहेत-- मार्गारेट मिड

शाश्वत विकासात वैयक्तिक व समाजाची कर्तव्य:

समाजाच्या निकोप विकासाकरता प्रत्येकाने व समाजाने पुढील कर्तव्य पार पाडणे आवश्यक आहे. प्रत्येकाने दरवर्षी किमान एक झाड लावले पाहिजे, व त्याचे संगोपन केले पाहिजे. पाण्याचा वापर गरजेपुरता केला पाहिजे. आपापल्या घरात काटकसरीने वीज वापरली पाहिजे. सौर ऊर्जा पासुन ऊर्जेचा उपयोग केला पाहिजे. घरातील केरकचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली पाहिजे,घरात व घराच्या आवारात स्वच्छता ठेवली पाहिजे. घरातील टीव्ही, टेप यांचा आवाज मर्यादित ठेवून ध्वनी प्रदूषण टाळले पाहिजे. कागदांचा वापर काटकसरीने केला पाहिजे, तसेच रद्दी जाळून नये. गरजे इतकेच पेट्रोल व डिझेलचे वाहन चालवायला हवेत. सायकलवरचे सारख्या वाहनाचा जास्त उपयोग करायला हवा, घरातील जैविक कचरां न फेकता त्याचे सेंद्रिय खत तयार करण्यास मदत घ्यावी. घरातील व सार्वजनिक शौचालयांमध्ये स्वच्छता ठेवावी सांस्कृतिक किंवा सामाजिक कार्यक्रम, साजरी करताना लाऊड स्पीकर चा आवाज कमी ठेवावा.गाय रानात फक्त गुरे चारा इतर वनस्पती चालण्यास बंदी घातली पाहिजे .नदी तलाव किंवा इतर जलाशयात गुरे धुऊ नये, रस्त्याच्या कडेला सौच्या बसू नये, शौचालय बांधण्याची विनंती करावी. कृषी पिकांना पाटपाणी न देता ठिबक किंवा तुषार सिंचनाचा उपयोग करावा. अशी खबरदारी प्रत्येक नागरिकांनी आणि समाजाने स्वीकारली तर पर्यावरण संवर्धन, संरक्षण आणि शाश्वत विकासाला चालना मिळेल यात शंका नाही.

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

सारांश:

आज जगातील बहुतेक देशांना पर्यावरण रक्षण व संवर्धनाची जाणीव झाली आहे, जन परिवर्तन आणि कायदे करून प्रत्येक देशात पर्यावरणाचा शाश्वत विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शाश्वत विकासाकरिता प्रथम पर्यावरण रक्षणाची जाणीव जगातील अनेक देशातील जनतेला होत आहे अनेक स्वयंसेवी संघटना शासकीय व खाजगी संस्था कार्यक्रम राबवित आहेत. विविध संघटना जैविक घटकांची उत्पादन क्षमता व मानव कल्याण यासाठी कार्य करीत आहेत.

संदर्भ सूची :-

१. प्रा. चौधरी ए.पी, प्रा.चौधरी अर्चना, संपूर्ण पर्यावरणशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, २०१३,पान न ३०१ते३०५

२. वानखेडे दत्ता, शाश्वत विकास संपादक ,पीबीडी पब्लिकेशन पुणे २०१५,पान न.१,२

३. https://www.un.org>development

४. https://mr.m.wikipidia.wiki

५. https://www.vedantu>wiki

६. https://www.loksatta.com>carere

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani